जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्याकरीता कंत्राटी विधी अधिकारी यांचे एक पद व त्यांना सहाय्य करण्यासाठी लघुटंकलेखकाचे एक अस्थायी पद निर्माण करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदनि - २०१६/प्र.क्र.२३१/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ०८ डिसेंबर, २०१७.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८, दि.६ एप्रिल, २०११.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८, दि.३० जुलै, २०११.
३) शासन अधिसूचना, क्र.प्राफेब ११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/म-१०, दि.१७ जून, २०१४.
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. पदनि-२०१४/प्र.क्र.१३५/ई-८, दि.३१ जुलै, २०१४.
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१०७/ई-८, दि.१५ सप्टेंबर, २०१७.
६) जिल्हाधिकारी, पालघर यांचे अ.शा. पत्र
क्र. मह/आस्था.१/का.१/पदनिर्मिती/कावि-६२९/१६, दि.१८/१०/२०१६.
क्र. मह/आस्था.१/का.१/पदनिर्मिती/कावि-०७/२०१७, दि.१९/०६/२०१७.

प्रस्तावना:-

राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणांत परिच्छेदनिहाय अहवाल तयार करणे, शपथपत्र तयार करणे, न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करुन शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच शासकीय वकीलांना सहाय्य करणे, इत्यादी कामांसाठी संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि.०६ एप्रिल, २०११ अन्वये ३५ जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्येकी १ याप्रमाणे ३५ विधी अधिकारी यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यास मान्यता देवून त्यांना सहाय्य करण्यासाठी ३५ लघुटंकलेखकांची अस्थायी पदे निर्माण करण्यात आली आहेत.

२. संदर्भ क्र.३ येथील दिनांक १७ जून, २०१४ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होवून दि.०१.०८.२०१४ पासून पालघर जिल्हा नव्याने निर्माण करण्यात आला आहे. त्यानुषंगाने

संदर्भ क्र. ४ येथील दि.३१.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पालघर जिल्ह्याकरीता विविध संवर्गातील १०२ पदांची निर्मिती करण्यात आली असून त्यामध्ये “विधी अधिकारी” व “लघुटंकलेखक” (इंग्रजी) या पदांचा समावेश नाही. यास्तव जिल्हाधिकारी, पालघर यांनी संदर्भ क्र.६ येथील पत्रांन्वये शासनास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणांसंदर्भात तातडीने कार्यवाही होण्याकरीता पालघर जिल्ह्याकरीता १ विधी अधिकारी यांची सेवा कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करण्यास व त्यांना सहाय्य करण्यासाठी लघुटंकलेखकांचे (इंग्रजी) १ अस्थायी पद निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने मा. मंत्रिमंडळाने दि.२३.०८.२०१७ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीने पालघर जिल्ह्यासाठी कंत्राटी “विधी अधिकारी” एक पद व अस्थायी लघुटंकलेखक (इंग्रजी) एक पद निर्माण करण्यास मान्यता दिली आहे.

शासन निर्णय:-

जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवर पुढील पदे खालील अटी व शर्तीवर निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतन	पदांची संख्या
१	विधी अधिकारी (कंत्राटी पद्धतीने)	रु. ३०,०००/- + ५०००/- (एकत्रित मानधन व दुरध्वनी, प्रवास खर्च)	१
२	लघुटंकलेखक (इंग्रजी)	वेतन श्रेणी रु. ५२००-२०२००/- ग्रेड पे रु. २४००/-	१

१) सदरहू “विधी अधिकारी” पदावर कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यास संदर्भ क्र.२ येथील दि.३०.०७.२०११ च्या शासन निर्णयातील सर्व अटी लागू राहतील.

२) सदरहू “विधी अधिकारी” पद नियमित स्वरुपात न भरता ते ११ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर संदर्भ क्र.२ येथील दि.३० जुलै, २०११ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” व परिशिष्ट “ब”मध्ये शासनाद्वारे विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार किंवा सेवा प्रवेश नियम तयार करुन त्यामधील तरतुदीसार भरण्यात यावीत.

३) लघुटंकलेखकाच्या अस्थायी पदाची नियुक्ती “विधी अधिकारी” यांच्या नेमणुकीच्या अनुषंगाने राहील.

२. सदरहू कंत्राटी विधी अधिका-यांना अदा करावयाच्या मानधन, दुरध्वनी व प्रवासापोटी होणारा ठोक वेतनाचा खर्च तसेच लघुटंकलेखकाच्या वेतनावर होणारा खर्च “मागणी क्र. सी-१, २०५३-जिल्हा

प्रशासन (००) ०९३ जिल्हा आस्थापना (०१) सर्व साधारण आस्थापना (०१) (०१) आयुक्त कोकण (२०५३ ००२८) ०१ - वेतन या लेखाशिर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५८४/आपुक, दिनांक १६/११/२०१७ रोजी दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२०८१३३७०७४२१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.12.08 14:01:56 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, म. रा. मुंबई.
४) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
५) जिल्हाधिकारी, पालघर.
६) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर.
८) सह सचिव/उप सचिव (कार्यासन व्यय-९/आपुक) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) सह सचिव/ उप सचिव (कार्यासन ब-१/विधी/ ई-७) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.